## आम्ही स्वाभिमानी विशेषांक

या निमित्ताने आम्ही एक विशेषांक सादर करत आहोत. या अंकात मान्यवरांचे, कृषि तज्ज्ञांचे लेख, अनेक कंपन्यांच्या उत्पादनांची विस्तृत माहिती, कृषि तंत्रज्ञानाची ओळख आदि विषय समाविष्ट करणार आहोत प्रत्येक शेतकऱ्याच्या घरात हा अंक संग्रहणीय व माहितीपूर्ण असलाच पाहिजे. तरी या संग्रहणीय अंकास आपली जाहिरात देऊन सहकार्य करावे.

**अंक आकार :** क्राऊन ए फोर (१८-२४ सेमी), **प्रती :** २५,०००



सूचना : डी.डी वा धनादेश **"स्वाभिमानी प्रतिष्ठान"** या नावाने काढावा.

## जाहिरात दरपत्रक

| | |
|---|---|
| कव्हर पान दोन बहुरंगी | : रु. १,००,०००/- (पॅकेज सह) |
| कव्हर पान तीन बहुरंगी | : रु. १,००,०००/- (पॅकेज सह) |
| मलपृष्ठ बहुरंगी | : रु. १,५०,०००/- (पॅकेज सह) |
| आतील पान एक बहुरंगी | : रु. १,००,०००/- (पॅकेज सह) |
| पूर्ण पान बहुरंगी | : रु. ३०,०००/- |
| अर्धे पान बहुरंगी | : रु. १८,०००/- |
| पाव पान बहुरंगी | : रु. ६,०००/- |
| पूर्ण पान एकरंगी | : रु. १२,०००/- |
| अर्धे पान एकरंगी | : रु. ५,५००/- |
| पाव पान एकरंगी | : रु. ३,५००/- |
| शुभेच्छा जाहिरात (एक रंगी) | : रु. १,०००/- |




# आकिवाटमध्ये सा.रे. पाटील गटचा धुव्वा

## स्वाभिमानीचे निर्विवाद वर्चस्व

**अकिवाट (ता. शिरोळ) :** येथील जनता विकास सोसायटीच्या निवडणुकीत सत्तारूढ स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जनता शेतकरी विकास आघाडीने सा. रे. पाटील गटाचा धुव्वा उडवत सर्वच्या सर्व १७ जागा जिंकून सत्ता अबाधित ठेवली.

चुरशीच्या निवडणुकीत ७५.२ टक्के सभासदांनी मतदानाचा हक्क बजावला होता. गेली दहा वर्षे निवडणूक बिनविरोध होत असताना केवळ विरोधासाठी म्हणून निवडणूक लावली. पण सभासदांनी स्वाभिमानीवरच विश्वास ठेवून कारभार त्यांच्या हातात सोपवला.

यामध्ये निवडून आलेले उमेदवार पुढीलप्रमाणे : उळागड्डे बापू श्रीपाल, ऐनापूरे बाबुराव अप्पासो। कल्लणावर अजित दादासो, चौगुले प्रकाश सिद्धाप्पा, चौगुले विद्यासर तवनाप्पा, दानोळे आप्पासो भाऊ, नाईक महावीर बापू, पाटील नेमगोंडा रामगोंडा, फरांडे अजित आण्णाप्पा, रायनाडे भूपाल बाबासो,

बिगर कर्जदार गट : वळवाडे बाबासो कल्लाप्पा. अनुसुचित जमाती गट: कांबळे भुपाल कल्लप्पा. आर्थिक दुर्बल गट : रावसाहेब शंकर. इतर मागासवर्गीय गट : तहसिलदार ताजुद्दीन अप्पालाल, विशेष मागास प्रवर्ग गट : गावडे बापू कऱ्याप्पा, महिला राखीव गट : बडबडे कमल अप्पासो व शिरगुप्पे शकुंतला श्रीकांत.

हे सतरा उमेदवार प्रचंड मतांनी निवडून आले. जनता शेतकरी विकास आघाडीचे नेतृत्त्व विशाल चौगुले, ॲड. अजित कल्लणावर, विद्यासर चौगुले, संजय गायकवाड, महावीर किर्णीगे, श्रीमंत दानोळे यांनी केले. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून सहकार खात्याचे व्ही. जी. शिंदे यांनी काम पाहिले.




स्वाभिमानी विचार

Book-Post

प्रति,

RNI No. - MAH/MAR/2005/16213
Rgd. No. KLP/234/06/08

वर्ष ५ | अंक १० | १५ एप्रिल २०१० | किंमत ५ रुपये | पाने १२

# स्वाभिमानी विचार

RNI NO-MAH/MAR/2005/16213
REGD NO - K.L.P./234/06/08

संपादक : खासदार राजू शेट्टी






# राज्यात ११२ साखर कारखाने तोट्यात



**विशेष वृत्त**

**जयसिंगपूर (स्वाभिमानी वृत्तसेवा):** सहकारी साखर कारखान्यातील खाबूगिरीमुळे राज्यातील सुमारे ११२ सहकारी साखर कारखाने पूर्णतः तोट्यात निघालेल्या आहेत. राज्यात सध्या २०१ नोंदणीकृत साखर कारखाने आहेत. पैकी १६५ सहकारी साखर कारखाने आहेत. एकूण १४४ सहकारी साखर कारखाने चालू असून उर्वरीत ५७ सहकारी साखर कारखाने बंद पडलेले आहेत. महाराष्ट्राच्या सन २००९-१० च्या आर्थिक पाहणीत ही धक्कादायक बाब उघड झालेली आहे.

ऊस उत्पादक शेतकऱ्यांना देशोधडीस लावून स्वतःची तुबंडी भरून घेणारे साखर सम्राटांनी अनेक साखर कारखानेच गिळंकृत केलेले आहेत. महाराष्ट्रात २०१ सहकारी साखर कारखान्यांमध्ये २ कोटी १२ लाख ६२ हजाराहून अधिक ऊस उत्पादक सभासद असून साखर कारखान्यांमध्ये राज्य शासनाने ९९८.२५ कोटी भाग भांडवल गुंतवलेले होते. सन २००८-०९ या वर्षात ९०.९८ लाख टन साखरेचे उत्पादन झालेले होते. परिणामी दरात मोठ्या प्रमाणात पडझड झाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांनी उसाकडे आपली पाठ फिरवली पान ३ वर ▸








# धनंजय डोईफोडेंचे अभिनंदन

**संपादकीय**

डॉ. महावीर अक्कोळे
mahaveerakkole@gmail.com

कोल्हापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक ही जिल्ह्याची आर्थिक नाडी अर्थात अर्थवाहिनी समजली जाते. या अर्थवाहिनीला राजकारणाचा अड्डा करून, तिथे अत्यंत मनमानी कारभार करून ती खिळखिळी करण्याचे पध्दतशीर प्रयत्न गेली अनेक वर्षे या जिल्ह्यातल्या सहकार क्षेत्रातल्या अनेक दिग्गजांकडून कसे केले जात होते. याचा अतिशय धाडसाने भांडाफोड करून बँकेचे प्रशासक मंडळ प्रमुख व जिल्हा उपनिबंधक धनंजय डोईफोडे यांनी सहकार क्षेत्रातल्या अपप्रवृत्तीच्या डोळ्यात अंजन घातले आहे. आतातरी सहकार क्षेत्रातला विधायक जाग येण्यास हरकत नाही. एक एप्रिल रोजी केलेल्या या अत्यंत धाडशी कारवाईबद्दल त्यांचे स्वाभिमानीतर्फे मनःपूर्वक अभिनंदन, एका बाजूला सामान्य माणसाचा सहकारक्षेत्रावरचा, सहकारतल्या तत्वांवरचा विश्वासच उडून चालला असतानाच या नाजूक काळात डोईफोडेसारख्यानी निस्पृहपणे केलेल्या या कारवाईचे मोल शब्दात मोजण्यासारखे नाही.

एक एप्रिल रोजी श्री डोईफोडेंनी बँकेच्या आजीमाजी कारभाऱ्यांना हा भीमटोला दिल्यानंतर जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण राज्यात खळबळ माजली. वृत्तपत्रातील बातम्या पाहता त्या दिवशी तरी संबंधित नेते मंडळीना डोईफोडेसाहेबांच्या या दे धक्क्या ने चांगलीच बधीरता आलेली दिसली, कारण बहुतेकांचे मोबाईल स्वीच ऑफ तरी होते किंवा आऊट ऑफ कव्हरेज होते म्हणे. आमच्या मतदारसंघाच्या माजी खासदार माने वहिनींना तर हे प्रकरण एप्रिल फूल च वाटले म्हणे. माझा काही संबंध नाही, ज्या संस्थाचे कर्ज असेल त्यांच्याकडून ते वसूल करावे, अशीही टिप्पणी त्यांनी जोडली. अशीच भूमिका साऱ्या आजी – माजी कारभाऱ्यांनी घेतली तर मग कोणी कोणाकडून कोणाच्या जीवावर वसूली करायची हा प्रश्न सर्वापुढेच उभा राहील. तब्बल ११७ कोटी ६८ लाख २५ हजार ४५० रूपयांच्या जबाबदारीसाठी प्रशासकांनी जिल्हा बँकेच्या माजी संचालकासह कार्यकारी संचालक दीपक चव्हाण व इतर तीन अधिकारी अशा ४९ जणांवर स्पष्टपणे ठपका ठेवला आहे. यासह बँकेचे ३७ कर्मचारी व काही अधिकाऱ्यांनाही नोटीसा लागू केल्या आहेत. या सर्वांनी आपले म्हणणे मांडल्यानंतर पुरावे सादर केल्यानंतर हे चित्र अधिक स्पष्ट होईल पण ही सर्व रक्कम नियमबाह्य कर्ज वाटपातली व अनधिकृत लाभांश वाटपाची आहे. हे विसरता कामा नये. ही कर्ज सर्व नियम धाब्यावर बसवून एकतर विनातारण, अपुरे तारण, सदोष कागदपत्रे व चुकीच्या पध्दतीने शिफारस केल्यामुळे वाटली गेली होती. बँकेची स्थिती खालावण्याचे खरे व स्पष्ट कारण या कारवाईमुळे जनतेपुढे आले आहे. याचे श्रेय निश्तितच डोईफोडेंसाहेबांचे आहे.

रिझर्व बँकेचे श्री धनजंय डोईफोडे यांच्या नेतृत्वाखाली जेव्हा प्रशासक मंडळ नेमले तेव्हाच आम्ही स्वाभिमानी विचार मध्ये म्हटले होते, की डोईफोडेसाहेब आता फक्त आपणच या अनागोंदीच्या अराजकाच्या पार्श्वभूमीवर काहीतरी चांगले, नवी विधायक दिशा देणारे काहीतरी करू शकाल! आणि ते खरे ठरले. चौकशी चालू असताना देखील मंत्रीमहोदय मुश्रीफ व खासदारमहोदय मंडलिक यांच्यामध्ये धुळवड चालूच होती. दोघेही बँक बुडण्याचे कारण एकमेकांवर ढकलून कारवाईची मागणी करीत होते. आता दोघेही जवळपास चार कोटींहून जास्त रक्कमेसाठी जबाबदार आहेत असे पुढे आले आहे. गमंत म्हणजे दोघानांही मेळावे घेऊन बँक बचाव मोहीम चालू केली होती. त्यांच्या मनात बँकेचा बचाव कोणापासून करायचा होता कोण जाणे! पण बँक बुडाव मोहीम फत्ते केली त्यात एकमेकांवर आरोप करणारे हे दोघे गुरूशिष्यच नव्हते, तर जिल्ह्यातही सहकार क्षेत्रातली, राजकारणातली अनेक दिग्गज मंडळी जबाबदार होती हे सुध्दा पुढे आले आहे. या सर्व गदारोळात जिल्हा बँकेवर अनेक वर्षे अध्यक्ष म्हणून कारकीर्द गाजवलेले निमशिरगावचे सहकारमहर्षी कै. पी. बी. पाटील यांचे नाव या काळ्या यादीत नाहीत हे आदराने नमूद करावे लागेल.

एकंदरीत महाराष्ट्रात सहकाराला लागलेली अधोगती तुर्तास थांबण्याची चिन्हे दिसतच नाहीत पण शंभर वर्षे झाली म्हणून मिरवणाऱ्या सहकारक्षेत्राचे नि त्यातल्या सहकारसम्राटांचे भवितव्य काय हा प्रश्न आता संशोधन करून एखाद्याने पी. एच. डी. ची पदवी मिळविण्याएवढी जटील झाला आहे. डोईफोडे साहेबांनी एका चांगल्या डावाची सुरवात सहकारपंढरी असलेल्या कोल्हापूर जिल्ह्यातून केली आहे. आता पदांचा व व्यक्तींचा मुलाहिजा न ठेवचा कठोर कारवाई करून जिल्हा बँकेला खोल खाईतून वर काढून पुन्हा एकदा उर्जितावस्था आणणे हे केवळ तीव्र राजकीय याबाबतीत किती राजकीय इच्छाशक्ती दाखवतात तेही लवकरच कळेल. पण मधल्यामध्ये लाखो नव्हे कोट्यवधी शेतकऱ्यांची, सामान्य माणसांची , पिळवणूक होत आहे. त्यांचा वाली कोण याचे उत्तर आजतरी स्वाभिमानी शेतकरी संघटनेसारख्या लढाऊ नि रस्त्यावर उतरून संघर्ष करण्याची तयारी असलेल्या संघटना हेच आहे. सहकारक्षेत्र नासविणाऱ्यांनी हा इशारा लक्षात घेतला तर बरे होईल, धनजंय डोईफोडेंचे पुन्हा एकदा अभिनंदन!

◆ वर्ष ५ ◆ अंक १० ◆१५ एप्रिल २०१० ◆ **संपादक :** खासदार राजू शेट्टी Email : rajushetti@gmail.com
◆ **कार्यकारी संपादक :** डॉ. महावीर अक्कोळे ◆ **सह संपादक :** डॉ. श्रीवर्धन पाटील, जगदीश इनामदार,
◆ **मानद सल्लागार :** मा. श्री. अण्णा हजारे राळेगणसिद्धी, न्या. पी. बी. सावंत पुणे, न्या. बी. जी. कोळसे पाटील पुणे, . प्रा. शरद पाटील सांगली, कुमार सप्तर्षी पुणे, माजी आमदार. वामनराव चटप चंद्रपूर ◆ **व्यवस्थापक :** सुभाष शेट्टी
◆ **कार्यालय :** भरत पतसंस्थेच्या माडीवर, पोलीस स्टेशनसमोर, जयसिंगपूर, ता. शिरोळ. फोन : (०२३२२) २२४३२७

**SWABHIMANI VICHAR (Fortnightly)** स्वाभिमानी प्रतिष्ठान संचलित पाक्षिक स्वाभिमानी विचार हे पत्र संपादक *खासदार राजू उर्फ देवाप्पा आण्णा शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, पोलिस स्टेशननजीक, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. प्रकाशन स्थळ : स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र राज्य). दूरध्वनी : (०२३२२) २२४३२७. मुद्रण स्थळ : सुनील प्रिंटर्स, जयसिंगपूर. फोन (०२३२२) २२४३२७ पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी * यांची आहे. पाक्षिक स्वाभिमानी विचारमधील सर्व लेखांचे हक्क राखून ठेवण्यात आलेले आहेत. **Decleration No. Desk No. VII Home N.P.S.R./58/2005 RNI No. MAH/MAR/2005/16213** या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

**वार्षिक वर्गणी रु. १००/-**



# राज्यात ११२ साखर कारखाने तोट्यात

▸ पान ३ वरून

होती. त्याचा विपरीत परिणाम उसाच्या उत्पादनावर झाला होता. सन २००९ – १० साली ४६.१४ लाख टन साखरेचे उत्पादन झाले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात राज्याच्या ग्रामीण भागात सामाजिक व आर्थिक परिवर्तन यशस्वीपणे घडवून आणण्यामध्ये सहकारी साखर कारखान्यांची भूमिका महत्वाची मानले जायचे. याच धोरणाला या लबाड साखर सम्राटांनी हरताळ फासला आहे. तब्बल ५७ साखर कारखाने बंद पडलेले आहेत. हे बंद पडलेले साखर कारखाने सुरू करण्यासाठी राज्य शासन व केंद्र शासनाने कोट्यवधी रूपयांच्या निधीची मुक्त हाताने चौफेर उधळण केली. पॅकेजच्या नावाखाली अनेक साखर कारखान्यांच्या संचालकांनी कोट्यवधी रूपये लुबाडून स्वतःचेच भले करून घेतले आहेत. उसाचे उत्पादन घटल्यामुळे मळी तसेच उसाच्या चिप्पाड्याचेही मोठ्या प्रमाणात उत्पादन घटलेले आहे.

vishal Yadav 9850291294
9921151199



इंडो प्रिंटर सर्व्हिसेस
Dot Matrix Specialist
■ EPSON, TVS, WEP., HP ■ Sales & Services ■ Dot Matrix, Laser, Inkjet Printer Repairs ■ Printers Carterideges & Toner Refilling
चालू स्थितीतील जुने प्रिंटर मिळतील.
९ वी गल्ली, सुभाष रोड, देमापुरे ऑईल मिलजवळ, जयसिंगपूर

आदिशक्ती कन्स्ट्रक्शन
जयसिंगपूर
प्रोप्रा. मिलींद साखरपे

श्री भरत अर्बन को-ऑफ बँक लि., जयसिंगपूर
ता. शिरोळ, जि. कोल्हापूर फोन : २२५४३०, २२५७२२ २२९९२३ फॅक्स नं. : ०२३२२ २२५७२३
■ २८ हजारांवर सभासद ■ संस्थापक, संचालक व्यवस्थापन ■ सर्व शाखा कार्यालये स्वत:चे इमारतीत ■ अद्यावत कॉम्प्युटर सेवा ■ सर्व शाखांकडे लॉकर्सची सोय ■ लाखापर्यंतच्या ठेवीस विमा संरक्षण देशातील प्रमुख ४०८ शहरांवरील डी.डी.ची अल्प कमिशनमध्ये सोय ■ बँक सतत नफ्यात ■ ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवीवर १/२ टक्के जादा व्याज ■ १० ग्रॅम चोख सोन्यास रु. १३००० कर्ज १२ टक्के व्याजदराने

| ठेवी | कर्जे | ऑडिट वर्ग | बँक सतत | स्वभांडवल | गुंतवणूक |
|---|---|---|---|---|---|
| ३५८१.७९ | २१३४.९४ | ---- | नफ्यात | ४५०.४५ | १७७६.१८ |

श्री. व्ही. बी. हुग्गे. बी. ए. बी. कॉम. चिफ एक्झि ऑफिसर
श्री. अशोक शां रूणवाळ. बी. कॉम व्हा. चेअरमन
पै. विठ्ठल बाबूराव मोरे एम. ए. चेअरमन
व सर्व संचालक

TEXMO INDUSTRIES
५२ वर्षांची विश्वासाची परंपरा
Taro
SKF Ball Bearings
जैन एच.डी.पी.ई. पाईप्स
BCH स्टार्टर
अधिकृत विक्रेते
बाहुबली इलेक्ट्रिकल्स
आझाद रोड, ८वी गल्ली, जयसिंगपूर.
फोन:(०२३२२)२२५९०५,२२७४०५ मोबा.:९४२११७३१४७
गोमटेश इलेक्ट्रिकल्स
जामे मस्जिद समोर, मेट्रो ऑटोजवळ, पटेल चौक, सांगली.
फोन नं.(०२३३) २६२१०९६ मोबा.:९९६०४०६३१३

TEXMO
AQUATEX
अधिकृत विक्रेते
श्री वितराग एंटरप्रायझेस
सोन्या मारूती मंदिरासमोर, कोल्हापूर रोड, इचलकरंजी
फोन : (ऑ.) ०२३०/ २४३१०८
मोबा. : ● विपुल - ९३२६९५३०२७ ● बाबासाहेब : ९३२५७६१२२९

प्रोप्रा. अरुण किर्तीकुमार माणगावे
M/S. MANGAVE BOREWELLS
BOREWELL CONTRACTOR
Opp. Mangave Petrol Pump. Jaysingpur. Dist : Kolhapur (M.S.)
Ph. (02322) 229866. Mo. 9822551008/9422428266

Shree Datta Prestrestess
M.f. PCC Pole
Shirol Road, Jaysingpur.




# स्वाभिमानीतर्फे १ मे पासून कृषी महोत्सव

## लाखो शेतकरी उपस्थित राहणार

जयसिंगपूर (स्वाभिमानी वृत्तसेवा): स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने दि. १ मे ते ३ मे २०१० पर्यंत पहिले भव्य राज्यव्यापी कृषि अधिवेशन आणि कृषि औद्योगिक व पशु प्रदर्शनाचे आयोजन केले आहे. या कार्यक्रमाचे स्वागताध्यक्ष म्हणून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी असून निमंत्रक संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत असणार आहेत. या महोत्सवासाठी देशभरातून लाखो शेतकरी उपस्थित रा–हणार असून याची जोरदार तयारीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी कंबर कसलेली आहे.

शेती विषयक निर्माण होणारे विविध प्रश्न आणि त्यावरील उपाययोजना यांची संतुलीत माहिती ग्रामीण तसेच शहरी भागातील शेतकऱ्यांना उपलब्ध व्हावी यासाठी कृषी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या कृषी महोत्स–वामध्ये शेतकऱ्यांना अत्याधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देणे ... उत्पादने, उत्पादकांशी थेट संवाद घडवून देणे.... तज्ज्ञांची व्याख्याने आयोजित करून त्यांचे मार्गदर्शन घेणे, व्यापारास उदीमास चालना देणे, स्थानिक कौशल्ये व उपलब्धींना व्यासपीठ मिळवून देणे, तरूणांचे प्रबोधन करून त्यांना कृषी करीअर विषयक मार्गदर्शन करणे, स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन देणे, शासनाच्या विविध कृषि योजनांची माहिती करून देऊन अर्थव्यवस्थेला बळकटी आणणे, प्रगतशील शेतकऱ्यांना पारितोषक व प्रोत्साहन देणे, कृषी प्रदर्शनामुळे नवनवीन तंत्रज्ञान, उद्योग, बि – बियाणे, अवजारे, किटकनाशके, जोड व्यवसाय यांच्या माहितीची देवाणे घेवाण, ४५० हून अधिक स्टॉल्स्, राज्यातील मान्यवर नेते मंडळीची उपस्थिती, केंद्रीय नेत्यांचे मार्गदर्शन यामुळे या प्रदर्शनाला बहुआयामी, समग्र व व्यापक रूप येणार यात शंका नाही.

राज्यव्यापी कृषि अधिवेशनाची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे– १) देशात प्रथमच कृषीमहोत्सव संकल्पना २) देशात प्रथम कृषी अधिवेशन ३) विविध सत्रात विविध विषयांचा समावेश ४) शेतकऱ्यांच्या जिव्हाळ्याच्या प्रश्नांवर आवाज ५) कोल्हापूर जिल्ह्यात मोक्याच्या ठिकाणी प्रदर्शन ६) जयसिंगपूर शहरात प्रथमच भव्य आयोजन ७) लाखो शेतकऱ्यांची उपस्थिती ८) स्थानिक व राज्यस्तरीय भरपूर प्रसिध्दी ९)राष्ट्रीय पातळीवरील राजकीय नेत्यांची हजेरी १०) कृषी क्षेत्रातील नामवंताची हजेरी ११) तज्ज्ञांची व्याख्याने – सेमिनार्स १२) प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मान १३) पीक स्पर्धा १४) वैविध्यपूर्ण पशुपक्षी प्रदर्शन १५) नामवंत कंपन्यांचे स्टॉल्स् १६) शासनाच्या विविध योजनांची माहिती १७) अद्ययावत कृषि तंत्रज्ञानाची ओळख १८)पार्किंगची प्रशस्त सुविधा १९)चोख सिक्युरिटी व बंदोबस्त २०) विभागवार स्टॉल्स् २१) फूड फेस्टीवल २२) फ्रूट फ्लॉवर शो २३)येण्याजाण्यासाठी वाहतूक सुविधा २४)करमणुकीचे कार्यक्रम २५) स्थानिक कलाकरांना व्यासपीठ २६) लोककलांचा भव्य मेळावा आदी सुविधा उपबल्ध होणार आहेत.

# वीजपुरवठा खंडित करण्यापूर्वी नोटीस देण्याच्या सूचना


**पुणे (प्रतिनिधी):** थकबाकीदार वीज ग्राहकांचा वीजपुरवठा खंडित करण्यापूर्वी त्यांना नोटीस देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अशी माहिती महावितरणकडून कळविण्यात आली आहे.

आर्थिक वर्षाच्या अखेरीस महावितरणकडून थकबाकी वसु–लीची मोहीम सुरू करण्यात आली आहे. यामध्ये ग्राहकांना नोटीस न देता वीजपुरवठा खंडीत करण्याच्या तक्रारी आल्या होत्या. त्या पार्श्वभूमीवर महावितरणकडून भूमिका स्पष्ट करण्यात आलेली आहे. थकबाकीदार ग्राहकांना पंधरा दिवस अगोदर सु–चना देण्यात येते. त्या संदर्भातील सूचनापत्र वीजबिलाबरोबर पाठविण्यात येते. दोन ते तीन महिने थकबाकीदार असणारे किंवा पंधरा दिवसांची मुदत समाप्त झालेल्या ग्राहकांचाच वीजपुरवठा खंडित करण्यात येतो आणि पुरेशी नोटीस देण्याबाबत कर्मचाऱ्यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत. असे महावितरणने स्पष्ट केलेले आहे. महावितरणचे कर्मचारी, तसेच महावितरणने अधिकृत नियुक्त केलेल्या एजन्सीच्या कर्मचाऱ्यांकडूनच हे काम करून घेण्यात येते.

# वीजदरवाढीचा झटका पुन्हा देण्याची तयारी

**पुणे (प्रतिनिधी)** : एकीकडे भारनियमनाचे संकट तीव्र होत असतानाच महावितरणने वीज ग्राहकांना पुन्हा एकदा वीज दरवाढीचा जोरदार झटका देण्याची तयारी केलेली आहे. घरगुती वीज ग्राहकांवर १४ टक्के बोजा महावितरणच्या प्रस्तावानुसार पडणार आहे. कृषी पंपाच्या वीजदरात ९ टक्के, उद्योगांच्या वीजदरात १६, तर लघुउद्योगांच्या वीजदरात १४ टक्के वाढ या प्रस्तावानुसार वीजेची दरवाढ होणार असल्यामुळे ग्राहकांना याचा सर्वात मोठा फटका बसणार आहे.

महावितरणने दरवाढीच्या मंजुरीसाठी राज्य नियामक आयोगाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. येत्या मे महिन्यात त्यावर राज्याच्या विविध भागात सुनावणी झाल्यानंतर आयोग दरवाढीबाबत अंतिम निर्णय घेणार आहे. विजेच्या सध्याच्या दरानुसार या आर्थिक वर्षात ४ हजार १६६ कोटी रूपयांची तूट येणार आहे. त्यामुळे वीजदरात सरासरी १४ टक्के वाढ करावी लागत आहे, असे महावितरणच्या प्रस्तावात म्हटले आहे. यापूर्वी करण्यात आलेल्या वीजदरवाढीतून मॉल, व्यापारी संकुलांना वगळल्यामुळे महावितरणवर राज्यभरातून टीका झाली होती. या पार्श्वभूमीवर यंदा वीजदरवाढीचा प्रस्ताव तयार करताना त्यात मॉल, व्यापारी संकुलांना सामावून घेताना दारिद्रयरेषेखालील नागरिक व शेतीच्या विजेच्या दरातही वाढ करण्यात आली आहे. कृषी पंपाच्या वीजदरात गेल्या काही



वर्षात पहिल्यांदाच वाढ करण्यात आली आहे.

या दरवाढीचा सर्वाधिक फटका अर्थातच महागाईशी सामना करणाऱ्या सर्वसामान्यांना बसणार आहे. घरगुती वीजग्राहकांना आकारण्यात येणार स्थिर आकार ३० वरून ६० रूपये आकारण्याची शिफारस करण्यात आलेली आहे. दरमहा १०० युनिट वीज वापरणाऱ्या ग्राहकांसाठी युनिटमागे १५ पैसे, ३०० युनिट वापरण्यासाठी युनिट मागे ४० पैसे तर, ५०० युनिट वापरण्यासाठी युनिटमागे ६५ पैसे जादा दराने वीजबिल आकारण्यास परवानगी द्यावी, असे प्रस्तावात म्हटलेले आहे. दरमहा ३० युनिटपर्यंत वीज वापर असलेल्या दारिद्रयरेषेखालील नागरिकांकडून प्रतियुनिट ६६ पैशांऐवजी ८० पैसे दराने आकारणी करावी असे प्रस्तावात नमूद केलेले आहे. तसेच पथदिव्यासाठी करण्यात येणाऱ्या वीजपुरवठ्यात दहा टक्के वाढ करण्याची परवानगी मागितलेली आहे. शासकीय अनुदानित शैक्षणिक संस्था व रूग्णालयांना या दरवाढीतून वगळण्यात आलेले आहे.

वीजदरवाढीचा या प्रस्तावावर आयोगाच्या आदेशानुसार नागरिकांकडून हरकती व सुचना मागविण्यात येणार आहेत. पुढील महिन्यात त्यावर अमरावती, नागपूर, नाशिक, पुणे, औरंगाबाद व नवी मुंबई येथे सुनावणी घेण्यात येणार आहे.

महावितरणाच्या या प्रस्तावानुसार या आर्थिक वर्षात वीज खरेदीसाठी २५ हजार ६०५ कोटी, कर्मचाऱ्यांच्या वेतनासाठी २८३७ कोटी, व अन्य खर्च असा सुमारे ३४,३३५ कोटी रूपयांचा खर्च होणार आहे. सध्याच्या वीज दरानुसार २९,९४० कोटी रूपये उत्पन्न मिळणार असल्याने दरवाढ करावी लागणार .

## गावोगावी सोसायटीच्या मदतीने वजन काटे उभारा : खासदार राजू शेट्टी

**ताकारी (स्वाभिमानी वृत्तसेवा)**: साखर कारखान्यावरील उसाची काटामारी थांबवण्यासाठी गावोगावी सोसायटीच्या मदतीने वजन काटे उभारा. आपल्या शेतातील उसाचे वजन आपण पहा. वजन बरोबर आहे की नाही कायदेशीर अधिकार शेतकऱ्याला आहे. असे प्रतिपादन स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी यांनी केले. ते रेठरेहरणाक्ष (ता. वाळवा) येथे ग्रामस्थांच्यावतीने आयोजित सत्कार समारंभात बोलत होते.


खासदार शेट्टी म्हणाले, वीज निर्मितीसाठी धरणे बांधली. धरणासाठी ज्यांनी जमिनी दिल्या त्यांना वीज न देता शहरासाठी पहिला हक्क राज्यकर्त्यांनी दिला. शासनाने लेव्ही साखरेची टक्केवारी वाढविल्यामुळे टनाला ५२५ रूपये शेतकऱ्यांना नुकसान सोसावे लागत आहे. सरकारचे धोरण हे शेतकऱ्याला गरिबीतच ठेवण्याचे आहे. मूठभर व्यापाऱ्यांच्यासाठी शासनाने तीन लाख कोटींची कर्जमाफी दिली आणि ७० टक्के जनतेसाठी फक्त ७८ हजार कोटींची कर्जमाफी दिली. गावात व्यायाम शाळेसाठी लागणारा निधी त्यांनी देण्याचे सांगितले.

स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत म्हणाले, शेतकऱ्यांनी संघटित राहण्याची गरज आहे. त्याशिवाय शेतकऱ्यांना योग्य न्याय मिळणार नाही. आगामी वर्षात आपल्याला ऊस दरासाठी झगडावे लागणार आहे. स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे सांगली जिल्हाध्यक्ष बी.जी. पाटील यांनी मनोगत व्यक्त केले. पोलिस उपनिरीक्षकपदी निवड झालेले सारिका निकम, धनाजी मोरे यांचा सत्कार करण्यात आला. भाई शिवाजीराव मोरे, आप्पासाहेब पाटील, जयवंत पाटील, राजेंद्र पाटील, सचिन पवार, उपस्थित होते. सयाजी मोरे यांनी स्वागत केले. सचिन पवार यांनी सूत्रसंचालन केले. शिवाजी गोर्दिल यांनी आभार मानले.

## कर्जामुळे साताऱ्यात शेतकऱ्याची आत्महत्या

सातारा(स्वाभिमानी वृत्तसेवा): वाई तालुक्यातील पिराचीवाडी येथील तानाजी दौलती पोळ (वय-५०) यांनी औषधाच्या गोळ्या खाऊन आत्महत्या केली. पोळ यांना मधुमेहाचा त्रास होता. मधुमेहाच्या औषधाच्या बाटलीतील सर्व गोळ्या खाऊन आत्महत्या केली.

त्यांच्या शेजारी चिठ्ठी सापडली असून, त्यामध्ये आपण कर्जाला कंटाळून आत्महत्या करीत असल्याचे म्हटले आहे. या संदर्भात वाई पोलिस ठाण्यात नोंद झाली आहे.



## बाष्पीभवनामुळे कोयनेतील ७.३१ टीएमसी पाणीसाठा कमी

पाटण(स्वाभिमानी वृत्तसेवा): महाराष्ट्राची भाग्यलक्ष्मी ओळख असणाऱ्या कोयना धरणाला कडक उन्हाचा मोठा फटका बसलेला आहे. कोयना धरणातील ७.३१ टीएमसी पाणीसाठा बाष्पीभवनामुळे कमी झाला आहे. कोयना धरणातून दररोज ०.५८०५ घनफूट पाण्याचे बाष्पीभवन होत असल्याचे कोयना धरण व्यवस्थापनाने अहवालात स्पष्ट केले आहे.

वाढत्या उन्हाचा फटका धरणातील पाणीसाठ्यावर होऊ लागला आहे. कोयना धरण परिसरात उन्हाचा तडाखा वाढल्याने धरणातील पाण्याचे बाष्पीभवन होण्याचे प्रमाण जास्त आहे. कोयना धरणाची एकूण पाणीसाठवण क्षमता १०५ टीएमसी आहे. धरणात सध्या ६८.०३ टीएमसी पाणीसाठा तर २,१२८ फूट पाणीपातळी आहे. यापैकी उपयुक्त पाणीसाठा ६३ टीएमसी आहे. कोयना धरणातून दररोज ०.८५०५ दशलक्ष घनफूट पाण्याचे बाष्पीभवन होत आहे. धरण व्यवस्थापनाने आपल्या अहवालात ही माहिती दिलेली आहे. पाटण तालुक्यात उन्हाचा तडाखा मोठ्या प्रमाणात जाणवू लागला आहे. गेल्या आठवड्यात याचा फटका पाटण तालुक्यातील अनेक पाणीयोजनांना बसला आहे. अनेक ठिकाणचे झरे आटल्यामुळे अनेक गावांत भीषण पाणीटंचाई जाणवू लागली आहे.

# गणेश बेकरीची अल्पावधीतच गरूड भरारी

जयसिंगपूर (स्वाभिमानी वृत्तसेवा): शिरोळ तालुक्यातील नांदणी येथील गणेश बेकरीने अल्पावधीतच मोठी यशस्वी गरूडड भरारी घेतलेली आहे. येत्या काही दिवसात लातूर येथे नांदणी बेकरीची नूतन इमारत साकारत असून विदर्भात सर्वात मोठी बेकरी म्हणून नावारूपास येत आहे. त्यामुळे गणेश बेकरीचे संस्थापक अण्णासाहेब चकोते यांच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.

गणेश बेकरीच्या सातत्यपूर्ण प्रगतीची दखल घेवूनच भारत सरकारच्या खादी ग्रामोद्योग विभागाने नवी दिल्ली येथील विज्ञान भवन येथे ग्रामीण विभागामध्ये उद्योग सुरू करून ग्रामीण रोजगारामध्ये वाढ करणाऱ्या देशातील यशस्वी ग्रामीण उद्योजकांना आमंत्रित करून तत्कालिन पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या अध्यक्षेखाली मं मंत्रीमहोदयांच्या उपस्थितीत तीन दिवसीय चर्चासत्र घेण्यात आले होते. यासाठी अण्णासाहेबांची यशस्वी ग्रामीण उद्योजक म्हणून निवड झालेली होती. याची दखल ग्रामीण उद्योजक म्हणून निवड झालेली होती. याची दखल घेवून व वाढता नावलौकिक पाहून देशाच्या कानााकोपऱ्यातूनच नव्हे तर पाकिस्तान, कुवेत, श्रीलंका, आदी देशातील उद्योजक मान्यवर मंत्री, खासदार, आमदार यांनी गणेश बेकरीला आवर्जुन भेट देऊन गौरवोद्गार काढले आहेत. हे आवर्जुन सांगावे लागेल. मलेशिया येथील बेकरी मशिनरीज कंपनी चे उद्योजक केवीन - लू- मेंबह्यू यांनी गणेश बेकरीला भेट दिली. नांदणीसारख्या ग्रामीण भागातून नावारुपास आलेल्या बेकरीची निर्मिती पाहून ते आश्चर्यचकित झाले, भारावून गेले. बेकरीतील अत्याधुनिक मशिनरीज, स्वच्छता, टापटिपपणा व बेकरी परिसर पाहून त्यांनी आण्णासाहेबांचे खास कौतुक केले. या मलेशिया उद्योजकांनी




मलेशिया भेटीचे आमंत्रण दिले. भेटी दरम्यान आण्णांनी परदेशी उद्योजकांनी कोल्हापूरी फेटा बांधून आदरातिथ्याचा नमुनाच जणू त्यांनी दाखविला.

अण्णांचा नावलौकिक दिवसेंदिवस वाढतच आहे. त्यांच्या कार्याला कोणी नाकारू शकत नाही. एकेक पुरस्कार आणि जबाबदाऱ्या त्यांच्याकडे आपोआपच चालून येत आहेत. याचे उदाहरण म्हणजेच नुकतीच त्यांची ऑल इंडिया ब्रेड मॅन्युफ˘क्चरींग असोशिएशन दिल्लीच्या खजिनदारपदी झालेली निवड होय. दिल्ली येथे झालेल्या वार्षिक अधिवेशनात त्यांची निवड करण्यात आली.

२५ वर्षापूर्वी स्थापना झालेली अखिल भारतीय स्तरावर भारत सरकारच्या मान्यतेनुसार बेकरी व्यवसायाच्या विविध समस्या, बेकरी व्यवसायिकांच्या विविध मागण्या व बेकरी व्यावसासिकांना मार्गदर्शन करण्याचे काम या असोसिएशनच्या मार्फत करण्यात येते. व शासनदरबारी पाठपुरावा करण्यात येतो. देशातील सर्व राज्यातील नामांकित बेकरी उत्पादक सभासद म्हणून आहेत. गेली पाच वर्षे या असोशिएशनवर सभासद म्हणून गणेश बेकरीची नोंद झालेली होती. असोसिएशनचे चेअरमन मागासाहेब यांनी गतवर्षी नांदणी येथे येऊन बेकरीस भेट दिलेली होती.

नांदणीसारख्या ग्रामीण भागात व्यवसायाची कोणतीही पार्श्वभूमी नसताना प्रतिकूल परिस्थितीवर मात करून अत्याधुनिक असा भव्य प्रोजेक्ट निर्माण करून हजारो बेरोजगारांना रोजगार मिळवून देणारे, विविध समाजोपयोगी उपक्रम राबवून सामाजिक बांधिलकी जपणारे व महाराष्ट्र, कर्नाटक, गोवा या राज्यात दर्जेदार उत्पादनाव्दारे अल्पावधीत नामांकित ब्रँड निर्माण करणाऱ्या अण्णासाहेब चकोते यांच्या या कार्याची दखल घेऊन त्यांचा अधिवेशनात सन्मान करण्यात आला.

गणेश बेकरीच्या वतीने प्रत्येक वर्षी गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरी केली जाते. गणेश बेकरीची गणेश मिरवणूक व त्यामध्ये सादर होणारे कलाविष्कार म्हणजे नांदणी गावासाठी एक पर्वणीच असते. फटाक्यांची डोळ्याचे पारणे फेडणारी प्रचंड आतिषबाजी थक्क करणारी असते.

आतापर्यंतची त्यांची वाटचाल म्हणेज शून्यातून विश्व निर्माण करण्यासारखीच आहे. भाजीपाला उत्पादनासाठी भारतात नाव लौकिक मिळवलेल्या नांदणी गावाचा उल्लेख आता गणेश बेकरी नांदणी असा केला जातो आहे. यावरूनच त्यांचे कार्य किती सर्वदूर पोहोचले आहे हे कळते. मराठवाडा व लातूर परिसरातील बेकरी उत्पादनाची वाढती मागणी पाहून अण्णांनी लातूर येथे बेकरी युनिट, युध्दपातळीवर निर्माण करीत आहेत. एका स्वप्नांची स्वप्नपूर्ती झाली असे आपण म्हणू शकत नाही. कारण अण्णांचे कार्य पाहता त्यांच्या हातून अनेक समाजोपयोगी कामे होणार आहेत. एक नवे उज्वल भविष्य त्यांच्या कार्याची वाट पाहत आहे. त्यांच्या कार्यास मनापासून स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या हार्दिक शुभेच्छा !

## दहा लाख टनाहून अधिक ऊस गाळपाविना; शेतकरी चिंतेत

**कोल्हापूर (स्वाभिमानी वृत्तसेवा):** राज्यात अनेक ठिकाणी ऊस शिल्लक राहिला असून यामुळे शेतकऱ्यांची चिंता अधिकच वाढलेली आहे. १० लाख टनाहून अधिक ऊस गाळपाविना शिल्लक राहिलेला आहे. काही साखर कारखाने बंद झाले असून चालू साखर कारखाने शेतकऱ्यांचा ऊस नेण्यास टाळाटाळ करीत आहे.

राज्यात यंदा उसाची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे. गत तीनवर्षे उसाच्या दरात मोठ्या प्रमाणात पडझड झाली. याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसला. ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे कधीही न भरून निघणारा तोटा झालेला आहे. सोलापूर जिल्ह्यातच दोन लाखाहून अधिक टन गाळपाअभावी शिल्लक राहिला आहे. कारखान्यांची बनवेगिरी, ऊसतोडणी कामगारांचे अडेलतट्टूपणा आदी गोष्टींमुळे उसाचे नियमित गाळप झाले नाही. त्यामुळे ऊस मोठ्या प्रमाणात शिल्लक राहिलेला आहे. तसेच उन्हाच्या जबर तडाख्यामुळे उसाच्या वजनात मोठ्या प्रमाणात घट होत चाललेली आहे. याचा मोठा फटका शेतकऱ्यांना बसत आहे.

## सरत्या हंगामात कापसाला सर्वाधिक भाव

जळगाव(स्वाभिमानी वृत्तसेवा): राज्यातील कापसाला हंगाम सरत असताना सलामीपेक्षा अधिक किंमत मिळण्याचा हा बहुधा पहिलाच प्रसंग असावा. राज्यात प्रतिक्विंटल ३ हजार ४५० तर गुजरातमध्ये ३ हजार ६५० एवढा भाव मिळत आहे. वास्तविक कापूस खरेदीचा हंगाम संपण्यात आला असताना एवढा चांगला भाव मिळणे ही दुर्मिळ बाब आहे. पहिल्या वेचणीच्या कापसाला कापसाच्या व्यवहारात सलामीचा भाव म्हणतात आणि तो सर्वाधिक भाव म्हणूनच त्याची गणना केली जाते. मात्र, यंदा सरत्या हंगामाच्या कापसाला सर्वाधिक भाव मिळत असून, कापसाला आलेल्या तेजीचा हा परिणाम म्हणून खरेदी १५ मे पर्यंत सुरू राहील, अशी चिन्हे दिसत आहेत.

यंदाचा कापूस खरेदी हंगाम शेतकऱ्यांसाठी समाधान देणारा ठरला आहे आणि असा योग कधी तरी येतो. वास्तविक यंदाच्या एकूण उत्पादनापैकी ७५ टक्के कापूस खासगी क्षेत्रानेच खरेदी केला आहे. त्यातही ५० टक्के कापूस गुजरात राज्यात विक्री झाला आहे. संपूर्ण हंगामाचा आढावा घेतला तर खासगी क्षेत्रात खरेदी स्पर्धा केवळ गुजरात राज्यातील घेतलेली आघाडी केवळ महाराष्ट्रच नव्हे तर मध्य प्रदेशातील कापूस व्यापारी, जिनिंग कारखानदारांची मक्तेदारीला आव्हान देणारी ठरली आहे. एवढेच कायम पण सी. सी. आय आणि मुंबईच्या कंपन्यांनाही गुजरात ने घेतलेल्या आघाडीचा चांगलाच फटका बसला आहे. हंगाम सरला म्हणून राज्य कापूस



पणन महासंघाने ३१ मार्च लाच खरेदी बंद केल्याचे जाहीर केले, तर इतर बाहेरील मोठ्या खासगी संस्थानीही कापसाची आवक होईल, म्हणून आशा सोडली मात्र गुजरातकडे कापूस विक्रीसाठी वाहतूक होणे सुरुच आहे.

### २० लाख क्विंटल कापूस शिल्लक

खासगी व्यापाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीनुसार राज्यात किमान २० लाख क्विंटल कापूस शिल्लक राहिलेला आहे आणि अजूनही काही ठिकाणी कापसाची शेवटची वेचणी चांगला भाव देऊन खरेदी करीत आहे. अशी स्थिती प्रथमच अनुभवास येत असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.

### गाठीचे भावही तेजीत

परदेशात कापूस गाठींना चांगली मागणी होत असल्याने कापूस गाठींचा भाव तुलनेने वाढला आहे. तीन दिवसापूर्वी कापूस गाठींचा भाव २८ हजार रूपये होते. कापसाच्या बाजारात आलेल्या तेजीमुळे गुजरात मधील व्यापाऱ्यांनी प्रति क्विंटल ३ हजार ५०० रूपयांवरून ३ हजार ६०० रूपये केला आहे. त्यामुळे शेतकरीही वाढीव भाव मिळेलया आशेने कापूस साठवून ठेवलेला आहे.


# स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने कानडगावात मे महिन्यात निळवंडे पाणी परिषद

राहुरी (स्वाभिमानी वृत्तसेवा): निळवंडे धरणाच्या लाभक्षेत्रात असलेल्या राहुरी तालुक्यातील गावांना पाणी मिळावे या मागणीसाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने मे २०१० मध्ये कानडगाव येथे स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते खासदार राजू शेट्टी व प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत यांच्या प्रमुख उपस्थितीत पाणी परिषद होणार असल्याची माहिती शिवाजी गाडे यांनी दिली.

ते म्हणाले की,. राहुरी तालुक्यातील कानडगाव, निंभेरे, तुळापूर, गुहा, चिंचोली, वडनेर, बारागांव नांदूर, देवळाली प्रवरा कोल्हार खुर्द, तांभेरे, वाबळेवाडी, वरशिंदे, ताहाराबाद, म्हैसगाव, राहुरी आदी सुमारे २१ गावांना निळवडे धरणाच्या पाण्याच्या लाभक्षेत्रात समावेश करण्यात आलेला आहे. निळवंडे धरणाच्या प्रकल्प अंतर्गत अहमदनगर व नाशिक जिल्ह्यातील एकूण १८२ गावातील सुमारे ६४२६० हेक्टर क्षेत्र आठमाही सिंचनाखाली घेण्याचे प्रस्तावित आहे. व सिंचनासाठी उर्ध्व प्रवरा डावा व उजवा असे दोन प्रमुख कालवे आहेतय. सुमारे ८०८९ हेक्टक उजव्या कालव्यावर प्रस्तावित असून २१ गावांना सिंचनाचा लाभ होणार आहे. सिंचनासाठी प्रस्तावित असलेली ही गावे जिराईत आहेत. निसर्गाच्या अवकृपेमुळे या भागात शेती व पिण्याच्या पाण्याचा मोठा प्रश्न आहे. विशेष म्हणजे या भागातील शेती चांगली आहे. शेतकरी कष्टकरी आहेत. परंतु पाण्याची उपलब्धता नसल्याने या भागाचा विकास होऊ शकलेला नाही.

निळवडे धरण पूर्ण झाले. अकोले व संगमनेर तालुक्यातील कालव्याची कामे पूर्ण झाले. निळवंडे धरणात पाणीही अडवले गेले मात्र राहुरी तालुक्यात अद्याप कालव्याची कामेच केली नाहीत. त्यामुळे राहुरी तालुक्यात कालव्याची कामे कधी होणार व लाभक्षेत्रातील गावांना पाणी कधी मिळणार? असा सवाल गाडे यांनी करून उर्ध्व प्रवरा उजव्या कालव्याची एकूण लांबी ९७ किलोमीटर असून ही कामे त्वरीत सुरु होणे गरजेचे आहे. यासाठी मे २०१० मध्ये स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्यावतीने खासदार राजू शेट्टी व सदाभाऊ खोत यांच्या उपस्थितीत निळवंडे पाणी परिषदेचे आयोजन करण्यात आले असून या पाणी परिषदेमध्ये निळवंडेचे पाणी लवकरात लवकर मिळावे, या मागणीसाठी काय भूमिका घ्यायची, यासंदर्भात सविस्तर चर्चा करून आंदोलनाची पुढील रूपरेखा ठरविण्यात येणार असल्याचे यावेळी शिवाजी गाडे यांनी सांगितले.

## शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी ७ हजार कोटींचा प्रस्ताव



मुंबई (प्रतिनिधी): विदर्भातील सहा जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी राज्य शासनाने ७ हजार २६२.६४ कोटींचा प्रस्ताव तयार करून केंद्राकडे पाठवला असून त्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे.

विदर्भातील शेतकऱ्यांच्या आत्महत्या रोखण्यासाठी राज्य शासनाने डिसेंबर २००५ मध्ये १,०७५ कोटींचे तर जुलै २००६ मध्ये पंतप्रधानांनी ३,७५० कोटींचे विशेष पॅकेज जाहीर केले होते. २००६ मध्ये २,३३५ शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या. त्यापैकी १०२८ प्रकरणे कुटुंबियांना मदत देण्यासाठी पात्र ठरविण्यात आली. याशिवाय २००७ मध्ये १९५ आत्महत्या झाल्या. त्यापैकी ५९०, २००८ मध्ये १९०६ आत्महत्या झाल्या त्यापैकी ६२७, तसेच २००९ १५६० मध्ये आत्महत्या झाल्या त्यापैकी ४४६ प्रकरणे मदतीसाठी पात्र ठरविले आहेत.

## द्राक्षबाग गेल्याच्या तणावाने शेतकऱ्याचा मृत्यू

मिरज(स्वाभिमानी वृत्तसेवा): अवकाळी पावसाने द्राक्षबागेचे नुकसान झाल्याच्या तणावाने मिरज तालुक्यातील ढवळी येथील प्रकाळ गौराजे (वय : ४५ ) या शेतकऱ्याचा मृत्यू झाला.

गौराजे यांची एक एकर द्राक्षबाग आहे. गेल्या काही वर्षापासून ती सातत्याने नुकसानीत होती. यावर्षी चांगली जोपासना केली असतानाच अवकाळी पावसाने बागेचे मोठे नुकसान झाले. द्राक्षवेलींवर दावण्याने हल्ला केला. यावर्षीही बागेचे नुकसान झाल्याने ते तणावाखाली होते. बागेसाठी स्थानिक विकास संस्थेचे त्यांनी कर्ज घेतले होते. त्यांना कर्जाती चिंता नव्हती. मात्र द्राक्षबागेच्या नुकसानीच्या ते चिंतेत होते. काल दिवसभर त्यांनी बागेत औषधफवारणी केली. रात्री घरी जेवण केल्यानंतर फिरून येतो म्हणून ते बाहेर पडले. मात्र मध्येच त्यांना उलट्या झाल्या. त्यांनतर काही वेळातच त्यांच्या मृत्यू झाला.

## परिस्थितीला कंटाळून शेतकरी कन्येची आत्महत्या

**आसोली(प्रतिनिधी)**: सततच्या नापिकीने कुटुंबावर ओढवले दारिद्रय त्यातच वडिलांनी सोडलेली साथ यामुळे परिस्थितीपुढे हात टेकलेल्या सुर्यकांताने नियतीसमोर शरणागती पत्करली आणि मृत्युला कवटाळले. ही दुर्दैवी घटना गोदिया तालुक्यातील मुंडीपार येथे नुकतीच घडली. सूर्यकांता राधेश्याम पटले (वय : १९) या शेतकरीकन्येच्या बाबतीत असे घडले आहे.

प्राप्त माहितीनुसार सूर्यकांता राधेश्याम पटले ही आसोली येथील सुदामा शाळेची वर्ग ११ वीची विद्यार्थीनी होती. घरात तीच मोठी असून, तिच्यानंतर तीन लहान भाऊ आहेत. त्यांच्याकडे तीन एकर शेती असून, गेल्या पाच वर्षापासून नापिकीचे ग्रहण लागले आहे. अशातच सहा वर्षापूर्वी वडील राधेश्याम पटले यांनी कुणालाही न सांगता घर सोडले. त्यामुळे घरची सर्व जबाबदारी तिच्याच खांद्यावर आली. वडिलांचे छत्र हरविल्यामुळे आई कमलाबाई आणि तीन तीन लहान भावांच्या शिक्षणाच्या भार तिच्यावरच आला. घराचा भार पेलवत नसल्यामुळे व परीक्षाशुल्क भरू न शकल्यामुळे गेल्या वर्षी तिला परीक्षेतून वंचित रहावे लागले होते. परंतु शिक्षणाची गोडी असल्यामुळ तिने परीक्षेपासून वंचित राहावे लागले होते. परंतु शिक्षणाची गोडी असल्यामुळे पुन्हा तिने यावर्षी इयत्ता अकरावीत प्रवेश घेऊन परीक्षा दिली व लहान भावडांचेही शिक्षण सुरू ठेवले. परंतु, नापिकी तसेच शेतात जे उगवले होते, तेही पावसाने हिसकावून घेतल्यामुळे घरात खायला दाणाही उरला नव्हता. अशातच दोन - दोन दिवस उपाशी राहण्याची वेळ अख्ख्या कुटुंबियावर आली. यातच तिने भावांना सोबत घेऊन शेतात गहू लावला. परंतु, शेतातील गव्हू करपल्याने गव्हाला विळाही लावता आलेला नाही. अशातच गावातील मुलींची लग्ने लागून त्या सासरी गेल्या. परंतु, गरीब असल्यामुळे तिच्या घराकडे एकही विवाहयोग्य मुलगा फिरकला नव्हता. हे शल्य तिच्या मनात बोचत होते. शेवटी कंटाळून तिने मृत्यला कवेत घेतले. आत्महत्या केल्याची बातमी गावात पसरताच सर्वत्र शोककळा पसरली. ज्यांच्याकडे पैसा आहे, अशा व्यक्तींनाच शासनाच्या योजना दिल्या जातात.परंतु, जे खऱ्या अर्थाने गरीब आहेत. त्यांना जीव देऊन किमत चुकवावी लागते, यापेक्षा दुर्दैव ते कोणते?

कालपर्यंत शेतकरी व विद्यार्थ्यांच्या आत्महत्यासंदर्भात आपण वाचले होते. मात्र, शेतकरीकन्येच्या आत्महत्येची ही विदर्भातील पहिलीच घटना आहे, की जिला कुटुंबाचा गाडा हाकताना खचून व शासनाच्या उदासीन धोरणामुळे शेतकरीकन्येला आत्महत्येचा मार्ग पत्करला. शासनाला आतातरी खऱ्या लाभार्थींना लाभ देण्याचे सुचेल काय?




# शिक्षणाचा बाजार फोफावला

कोल्हापूर : बालवाडीच्या प्रवेशाकरिता डोनेशनबाजीने उच्चांक गाठलेला असून प्ले - ग्रुप गटासाठी एक लाख रूपयांची मागणी करण्यात आली आहे. बालवाडीला प्रवेश घेतल्यानंतर दहावीपर्यंतच्या प्रवे-शाची डोकेदुखी संपणार असल्याने पालकवर्गही जमेल त्या मार्गाने डोनेशनसाठीची रक्कम उभी करत आहेत. दहा वर्षाच्या कालवधीनंतर बालवाडी शाळा व प्रवेश नियमन



कायद्याचे पुनरूज्जीवन करण्यासाठी सहा महिन्यापूर्वी समिती स्थापन करण्यात आली होती. विभागीय स्तरावरील शिफारशीनंतर त्यासाठीचा आराखडा राज्य शासनाला सादर करण्यात येणार होता. परंतु मध्यंतरी विभावसभेचा आराखडा राज्य शासनाला सादर करण्यात येणार होता. परंतु मध्यंतरी विधानसभेचा आखाडा झुंजला आणि त्यांनतर आता शिक्षण खात्यासाठी पूर्ण वेळ मंत्रीही नाही. शिक्षण खात्याच्या बेपर्वाईमुळे पालकांची लूटमार चालू असून धनदांडगे त्यात हात धुवून घेत आहेत.

# भरत अर्बन बँकेला १६ लाख नफा

जयसिंगपूर (स्वाभिमानी वृत्तसेवा): येथील श्री भरत अर्बन को - ऑप बँकेने सन २००९ - १० या आर्थिक वर्षात चौफेर प्रगती केली असून बँकेचा एन. पी. ए. शुन्य टक्के व निव्वळ नफा १६ लाख रूपयांवर झाली असल्याची माहिती भरत बँकेचे अध्यश्र पै. विठ्ठल मोरे व उपाध्यक्ष अशोक रूणवाल यांनी दिली. यावेळी संस्थापक डॉ. जे.जे. मगदूम, श्रीमती अलका भालचंद्र कुंभोजकर तसेच सर्व संचालक उपस्थित होते. सन २००९ - १० या आर्थिक वर्षामिध्ये ठेवीमध्ये रू. ७ कोटी ३३ लाखाची लक्षणीय वाढ होऊन ठेवी रू. ४१४६.९५ लाख इतक्या झाल्या असून कर्ज वितरणामध्ये रू. १ कोटी ३५ लाखाने वाढ झाली असून एकूण कर्जे २१७८.८९ लाख इतकी झाली आहेत. याशिवाय भावभांडवलामध्ये रू. ८ लाख ८३ हजाराने वाढ होऊन एकूण भागभांडवल रू. १६४.६१ लाख इतके झाले आहे. तसेच गुंतवणुकीमध्ये रू. ४ कोटी ८२ लाखाने वाढ होऊन एकूण गुंतवणूक रू. २१८९.४३ लाख इतकी झाली आहे.

बँकेचे संचालक मंडळ व कमचारी यांच्या अथक परिश्रमामुळे थकबाकी वसुली चांगली झाली आहे. गतसाली थकबाकी रू. २५५.८८ लाख इतकी होती. सन २००९- १० या आर्थिक वर्षामिध्ये थकबाकी रू.१५९.२७ लाख शिल्लक राहिल्यामुळे थकबाकीचे प्रमाण ७.३१ टक्के इतके कमी झाले आहे. याचा ताळेबंदावर सकारात्मक परिणाम होऊन बँकेचा निव्वळ नफा रू. १६ लाख ३६ हजार इतका झाला आहे. बँकेने सन २००९ - १० या आर्थिक वर्षामध्ये नफ्यापोटी अॅडव्हॉन्स इनकम टॅक्स रू. ३.०० इतकी रक्कम जमा केली आहे. बँकेने रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या सर्व निकषांचे तंतोतंत पालन केले असून भविष्यात शाखाविस्तार करण्याचा तसेच इंटर बँकिंग कनेक्टीव्हीटी सुरू करीत असल्याचा मनोदय बँकेचे अध्यक्ष पै. विठ्ठल मोरे यांनी व्यक्त केला. सदरवेळी बँकेचे चिफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर व्ही. बी. हुग्गे तसेच सर्व कर्मचारी उपस्थित होते.



# द्राक्ष व उसासाठी इस्त्रायली तंत्रज्ञान



उस्मानाबाद(स्वाभिमानी वृत्तसेवा): उस्मानाबाद तालुक्याच्या तेर परिसरातील २१०० शेतकरी द्राक्ष व उसाची शेती करण्यासाठी शेतात इस्त्राइली पाणीवापर तंत्रज्ञानाचा वापर करणार आहेत. इस्त्राइल येथील या नव्या तंत्रामुळे शेतकऱ्यांना आता पारंपारिक पध्द-तीऐवजी पाणी देण्यात येणार आहे. अशा प्रकारचा राज्यातला पहिलाच पथदर्शक प्रकल्प असून यामुळे चाळीस टक्के पाण्याची



बचत होणार आहे. या प्रकल्पामुळे शेतातील पाण्याचे पहिल्यांदाच ऑडीटज् होणार आहे.

तेरणा मध्यम प्रकल्पांतर्गत ठिबक सिंचन योजनेत लाभार्थी शेतकऱ्यांसाठी पाठबंधारे विभागाने एक नवीन प्रकल्प सुरू केला आहे. प्रेशर फ्लो कंट्रोल मीटरज् यंत्राव्दारे शेतकऱ्यांना शेतात आवश्यक तेवढेच पाणी देण्यात येणार आहे. हे पाणी थेट पिकांच्या मुळांशी सिंचनाव्दारे देण्यात येणार असल्याने पाण्याची बचत होणार आहे. शिवाय पिकांना मुबलक पाणीही मिळणार आहे. शेतकऱ्यांना पूर्वी प्रचलित पध्दतीने म्हणजे कालव्यांतून पिकांसाठी पाणी दिले जात होते. कालव्यातील बरेच पाणी जमिनीत झिरपायचे, शिवाय त्याचे बाष्पीभवन व्हायचे. त्यामुळे पाण्याचा राबविणारा पहिला जिल्हा असून याला गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळाने मान्यताही दिली आहे.

# दुधाच्या दरात २ रूपयांनी वाढ : शेतकऱ्यांना दिलासा

कोल्हापूर (स्वाभिमानी वृत्तसेवा): राज्य सरकारने दूध खरेदी दरात वाढ करण्याचा निर्णय घेतल्यामुळे महागाईत होरपळणाऱ्या शेतकऱ्यांना काही अंशी दिलासा मिळालेला आहे.

सध्याचा उत्पादन खर्च पाहिला तर हा दरही शेतकऱ्यांना तुटपुंजाच आहे. उत्पादन खर्च वाढल्यामुळे शेतकऱ्यांच्या पदराच तोटाच सहन करावा लागत असून प्रति फॅट ४ रूपये करावी अशी मागणी दूध उत्पादक शेतकऱ्यांच्याकडून होत आहे. मात्र गायीच्या दुधामध्ये कोणतीही वाढ करण्यात आलेली नाही. मुंबईत ३४ रूपये प्रतिलिटर दराने दुधाची विक्री होणार आहे. दूध संघांनाही त्वरीत दुधाच्या विक्रीत वाढ करण्याचा निर्णय घेतला असल्यामुळे ग्राहकांना मात्र याची झळ सोसावी लागत आहे.

# ऊसतोडणी यंत्र ऑक्टोबरपर्यंत फडात

## साखर संघाचा केंद्राकडे प्रस्ताव ; पुढील हंगामात ७५० लाख टन ऊस

कोल्हापूर (स्वाभिमानी वृत्तसेवा): पुढील गाळप हंगामात उसाचे होणारे अतिरिक्त उत्पादन लक्षात घेऊन राज्य साखर संघाने ऊस तोडणी यंत्राचा वापर करण्यासाठी पुढाकार घेतला असून ऑक्टोबर २०१० पर्यंत ऊस तोडणी यंत्रे उसाच्या फडात उतरवण्याचा साखर संघाचा प्रयत्न आहे. त्याअनुषंगाने यंत्रांची प्रात्यक्षिक पाहणी करण्यात आली असून लवकरच केंद्राकडे प्रस्ताव पाठवण्यात येणार आहेत. दरम्यान, राज्यात पुढच्या वर्षी विक्रमी ७५० लाख टन उसाचे उत्पादन होण्याची शक्यता असल्यामुळे राज्य साखर संघाने गाळप हंगामाच्या नियोजनासाठी पावले उचलण्यास सुरवात केली आहे.

राज्यात यावर्षी ४ ते ४ लाख ५० हजार टन उसाचे गाळप होईल, असा अंदाज साखर संघाकडून व्यक्त करण्यात येत असतानाच अवकाळी पावसामुळे १० ते १५ टक्के उसाचे उत्पादन वाढले आहे. अपेक्षेपेक्षा दीड ते दोन महिने जास्त गाळप हंगाम लांबला. यावर्षी उसाची टंचाई दिसल असतानाही अशी परिस्थिती असेल तर पुढच्या वर्षी काय होईल? याची कल्पना आल्यामुळे राज्य साखर संघाने २०१० - ११ च्या गाळप हंगामासाठी नियोजन करण्यास सुरवात केली आहे. पुढच्या वर्षी उसाच्या अतिरिक्त उत्पादनाबरोबरच मजुरांचाही समस्या जाणवणार असल्याचे दिसून येते. यापूर्वीसुध्दा असा अनुभव आल्यामुळे साखर कारखान्यांनी तसेच राज्य साखर संघानेही मजुरांच्या समस्येवर कायम स्वरूपी उपाय म्हणून ऊसतोडणी मशीन खरेदीची तयारी केली होती. त्या संदर्भात १८मार्च रोजी मुंबई येथे राज्यातील साखर कारखान्यांचे चेअरमन व राज्य साखर संघात एक बैठक झाली. त्यात संभाव्य ऊस उत्पादनाचा अंदाज घेऊन यंत्र खरेदी करण्याबाबत चर्चा झाली. त्यांनतर ६ एप्रिल रोजी पुन्हा यासंदर्भात पुणे येथे बैठक झाली. त्यावेळी राज्यातील खासगी व सहकारी १०० साखर कारखान्याचे प्रमुख, ऊस तोडणी यंत्र निर्मिती करणाऱ्या ५ कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित होते. एका कारखान्यांना अर्थ प्रस्तावांना परवानगी मिळताच मशीन खरेदी करण्यात येणार आहेत. ऑक्टोबर १० पर्यंत उसाच्या फडात ही यंत्रे पोहोचली पाहिजेत या दृष्टीने साखर संघाचे प्रयत्न चालू आहेत.

कशी आहेत ही मशीन्स?

ऊस तोडणी मजुरांच्या समस्येवर कायमचे उत्तर म्हणून साखर कारखादारांनी या मशीनच्या खरेदीच्या निर्णय घेतला असून बहुतेक कारखाने हे मशीन खरेदी करण्यास इच्छुक आहेत. किमान ११ ते ९० लाख रूपये अशा या मशिनच्या किंमती आहेत. २४ तास अखंडित चालण्याची क्षमता असलेली ही यंत्रे २५० ते ३०० टनापासून एक हजार टनापर्यंत प्रत्येक दिवसाला ऊस तोडू शकतात. मात्र मोठ्या मशीनमुळे शेताची हानी येत होत असल्याचे दिसून आल्यामुळे लहान ते मध्यम क्षमतेतीच मशीन वापरली जाण्याची शक्यता आहे. या मशिनचा वापर चांगल्या प्रकारे तोडण्यासाठी उसाची लागवड पट्टा पध्दतीने करणे गरजेचे आहे.





# आंदोलनाविषयीचे प्रेम... अन् प्रेमातून लग्नाचेही आंदोलन

चळवळीत वळवळणारा माणूस कळवळणाराच असतो. त्याला घडणाऱ्या चुकीच्या गोष्टीबद्दल तीव्र संताप, तर त्याच्या मनातील एक कप्पा चांगल्या गोष्टीसाठी प्रेम या अडीच अक्षरांनी व्यापलेला असतो. म्हणून तुकारामांना 'ऐसी कळवळ्याची जाती, जडे लाभाविण प्रिती..' ही कळवळ्यातून निर्माण झालेल्या प्रेमाची, सर्वोत्तम उपमा सुचली असावी. असं प्रेम कुठेही बंदिस्त होत नाही, त्याला जात-पात-धर्म कुठल्याही भिंती आड येत नाही. तिथे असते निरपेक्ष भावन, व भावनेलाही असतो सामाजिक कार्याचा भाव... हे चाललं काय? प्रेम... आंदोलन व सामाजिक कार्य? काय संबंध...? हो, या सर्वांचा संबंध आहे. एका अजब प्रेमाच्या गजब कहानीशी. अन् ही काही चित्रपटाची स्टोरी नाही, तर हे प्रत्यक्षात घडलेले कथानक आहे. गत् काही वर्षांपासून विविध आंदोलनाच्या माध्यमातून एख नाव चर्चेत आहे... ते म्हणजे रविकांत तुपकर. खासगी शिकवणी विरोधात आंदोलन करणारा हा पोरगा, पुढे वेगवेगळ्या माध्यमातून आंदोलनात करून शेतकरी आंदोलनांना 'शिकवण' देणारा युवानेता बनला.




शरद जोशींनी तुपकर यांच्यावर विदर्भ युवा आघाडीची टाकलेली जबाबदारी, तर पुढे खा. राजू शेट्टींनी त्यांच्यावर महाराष्ट्र प्रदेश युवा आघाडीचा सोपवलेला भार.. हे त्याचे द्योतक आहे. शेतकरी आंदोलने करता-करता 'कफल्लक' झालेल्या रविकांतचे लग्न होईल की नाही झाले तर पोरगी कोण मरायला देईल? अशी शंका दरचेतर साडाच पण जवळचेही व्यक्ती करत होते. पर या सग्यासोयऱ्यांचा दूर-दूरपर्यंत विचार न करताजात-पात शिक्षण, पैसा-अडका या गोष्टीने 'दूर' असणाऱ्या पण विचाराने 'जवळ' आलेल्या 'शर्वरी' नावाच्या उचविद्या विभूषीत मुलीशी कोणालाही न कळून देता 'रविकांत' याचा नोंदणी विवाह झाला, तेंव्हा समोर आली.. अजब प्रेम की गजब कहाणी!

रविकांत तुपकर आंदोलनाने भारलेला युवक व ॲड. शर्वरी सावजी आंदोनात्मक वातावरणात लहानची मोठी झालेली मुलगी. यामुळेच चळवळीचा स्वभाव तिच्या वृत्तीत आला. पुढे वेगळ्या विदर्भाच्या मांडवात हे दोघे खऱ्या अर्थाने एकत्र आले. त्या दोघांच्या गप्पा रंगायच्या त्या शेतकरी समाजसेवेच्या शेतकरी हितासाठी भांडत-भांडत दोघांनी संवाद साधला व लग्न करण्याचा निर्णय घेतला. लग्नानंतर हे जोडपे थंड हवेच्या ठिकाणी हनीमुनला न जाता उन्हाचे चटके सोसत बोथबोडन (जि. यवतमाळ) या शेतकरी आत्म हत्याग्रस्त गावात गेले . तेथे २५ आत्महत्यग्रस्त कुटुंबीयांना त्यांनी भेट देऊन २ दिवस मुक्काम करून मेळघाटचा कुपोषित भाग गाठला. नंतर तुपकर गेले ते शेतकरी आंदोलनास प महाराष्ट्रात. असे हे जोडपे आन् त्यांचे प्रेम. प्रेमातून लग्नही आंदोलनात्मक पद्धतीने करणारे व लग्नानंतर आंदोलनात उतरणारे!!

# 'स्वाभिमानी'तर्फे नगरपालिकेसमोर उपोषण

## शाहू महोत्सव व नगराध्यक्ष शुटींग बॉल स्पर्धेतील आर्थिक व्यवहार

**जयसिंगपूर (स्वाभिमानी वृत्तसेवा):** जयसिंगपूर नगरपालिकेच्या वतीने घेण्यात आलेल्या शाहू महोत्सव व नगराध्यक्ष शुटींग बॉल स्पर्धेतील आर्थिक व्यवहार संशयास्पद असून सदर प्रकरणाची त्वरीत चौकशी व्हावी, या मागणीसाठी जयसिंगपूर स्वाभिमानी पक्षाच्या वतीने नगरसेवक डॉ. महावीर अक्कोळे यांच्या नेतृत्वाखाली नगरपालिकेसमोर एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण करण्यात आले.

जयसिंगपूर नगरपालिकेच्यावतीने नुकत्याच शाहू महोत्सव व शुटींग बॉल स्पर्धा घेण्यात आल्या. मात्र जयसिंगपूर नगरपालिकेने सदर खर्चाचा तपशील जाहीर केला नाही. आम्ही वेळोवेळी मागणी करुनही खर्चाबाबत उडवाउडवीची उत्तरे देण्यात आली. तसेच याबाबत जिल्हाधिकाऱ्यांच्याकडेही तक्रार करण्यात आलेली आहे . सदर प्रकरणातील सत्य माहिती जनतेला कळायलाच पाहिजे. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्यासाठी स्वाभिमानी पक्ष जयसिंगपूर शहराच्या वतीने जयसिंगपूर नगरपालिकेसमोर एक दिवसाचे लाक्षणिक उपोषण करण्यात आले. यावेळी स्वाभिमानी पक्षाच्या वतीने शिरोळ तहसीलदारांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, जयसिंगपूर नगरपरिषदेच्या सन २००९ - १० मंजूर अर्थसंकल्पात नगराध्यक्ष चषक शुटींग बॉल स्पर्धा हा कार्यक्रम आयोजित करण्याकरिता उचित तरतूद केलेली आहे. परंतु राजर्षी शाहू महोत्सल साजरा करण्याच्या खर्चाची तरतूद उपरोक्त अंदाजपत्रकात दिसून येत नाही. जयसिंगपूर नगरपरिषदेने २४ जानेवारी ते २६ जानेवारी २०१० या काळात राजर्षी शाहू महोत्सव साजरा केला आहे. या दोन्ही महोत्सवासाठी झालेल्या खर्चास ठराव नं. ३२४ ने मान्यता दिली आहे. नगरपरिषदेने यासंबंधी जी पत्रके प्रसिध्द केली आहेत. त्यात शुटींग बॉल स्पर्धेकरिता आठ विविध लोकाच्यांकडून आठ बक्षिसे देण्याकरिता त्यांना प्रायोजक म्हणून मान्यता दिली असे कागदपत्रावरून दिसते. तसेच विविध चार बक्षिसांसाठी प्रोयजकाकडून बक्षिसाची रक्कम प्राप्त झाली आहे. बक्षिसे एकतर नगरपरिषदेचे सदस्य किंवा नगरपरिषदेकडे काम करणाऱ्या मान्यताप्राप्त ठेकेदारांचाच अंतर्भाव आहे. ही गोष्ट मार्गदर्शक तत्वाच्या भंग करणारी आहेत. वास्तविक पाहता या प्रायोजकांकडून मिळणाऱ्या रक्कमा महाराष्ट्र नगरपरिषदा नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ९० प्रमाणे मुनिसिपल फंडात जमा करून घेणे जरूरीचे असताना त्यांसंबंधी तपशीलवार प्रस्ताव तयार करून त्या प्रस्तावास सक्षम समितीची अगर नगरपरिषदेची मंजूरी घेतलेली दिसत नाही. ही बाब लेखापरिक्षणाच्या संकेताच्या विरूध्द आहेत व आक्षेपार्ह आहेत. महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ मधील कलम ४९ (३) मधील तरतुदी पाहता या दोन्ही कार्यक्रमांचा खर्च २००००/- रूपयांपेक्षा जास्त खर्च झाला असताना त्याकरीता शासनाची मंजूरी घेतलेली नाही. स्वाभिमानी पक्षाच्या वतीने नगरपालिकेसमोर जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. जयसिंगपूर नगरपालिकेच्या वतीने फेब्रुवारी महिन्यात राजर्षी शाहू महोत्ववाच्या कार्यक्रम घेण्यात आला होता. यामध्ये खर्चाचा कोणताही तपशील देण्यात आलेला नाही. शाहू महोत्सवाच्या खर्चाची तरतूद किमान १ लाख असताना या महोत्सवावर सुमारे चौपट ते पाचपट म्हणजे ४ लाख ते ५ लाख खर्चाची उधळपट्टी झाली आहे. तर जे. पी. एल. शुटींगबॉल स्पर्धेच्या खर्चाची तरतूद किमान २ लाख ५० हजार असताना या शुटींग बॉल स्पर्धेवर ८ लाख ते ९ लाख जादा खर्च झाला आहे. सर्व खर्चाची रक्कम कोठे गेली. या वादग्रस्त घटनेवर जमा तपशील नाही. या सर्व प्रकरणाची चौकशी झालीच पाहिजे या मागणीसाठी नगरसेवक डॉ. महावीर अक्कोळे यांच्या नेतृत्वाखाली शहराध्यक्ष शैलेश आडके, शैलेश चौगुले, सागर मादनाईक, राजू नरदे, रावसो मर्जे, रविंद्र कांबळे, बाबासो पाटील आदी लोकांनी उपोषण केले. शेवटी नायब तहसीलदार श्री ऐतवडे यांनी उपोषणस्थळी भेट देऊन कार्यकर्त्यांची विचारपूस केली. तसेच कारवाईचे आश्वासन देऊन निवेदन स्वीकारले. उपोषण कर्त्यांना शिवसेना, भाजपा, आर. पी. आय, दलित सेना, नगरसेवक चंद्रकांत खामकर, माजी नगराध्यक्ष पी. डी. पाटील, ॲड. संभाजीराजे नाईक, विजय माणगांवे, तेजराज महाराज आदी जणांनी भेट देऊन आपला पाठिंबा व्यक्त केला.



जयसिंगपूर : येथे उपोषण करताना स्वाभिमानीचे कार्यकर्ते




### यड्रावकरांचा जळफाट

स्वाभिमानी युवा आघाडीच्यावतीने जयसिंगपूर नगरपालिकेच्या भ्रष्ट कारभाराविरूद्ध कार्यकर्ते उपोषणाला बसल्यावर माजी नगराध्यक्ष संजय पाटील-यड्रावकरांचा आंदोलनादिवशी रागाचा पारा वर चढला होता. उपोषणाला बसल्यावर संजय यड्रावकरांनी स्वत:च कॅमेरा हातात घेऊन आंदोलकांचे फोटो काढण्यास सुरवात केली. त्यानंतर कहर म्हणजे माजी नगराध्यक्ष तथा शुटिंगबॉल स्पर्धेचे सर्वेसर्वा राजेंद्र नांद्रेकर यांनी आंदोलकांचे मोबाईलवर व्हिडीओ शुटिंग सुरू केले होते. यावरूनच सत्ताधाऱ्यांच्या मनात आंदोलनाविषयी किती काहूर माजले होते याची प्रचिती आली.